Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 14, Issue 4 – Dec 2024

Impact Factor : 7.665

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

UGC CARE I

# वैदर्भीय कादंबरी-ग्रामीण जीवनाची कथा

**विजया विनायकराव वानखेडे,** संशोधक, स्नातकोत्तर मराठी विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
**डॉ. राकेश देवरावजी कभे,** संशोधन मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख, महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी जि. नागपूर

**गोषवारा**

वैदर्भीय ग्रामीण कादंबरीचा विचार, हा ग्रामीण जीवनाची वास्तविकता राजकीय, सामाजिक, आर्थिक, समस्यांना झुंज देत, जगले जाणारे जीवन हेच ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण, वैदर्भीय ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून अभ्यासनीय ठरते. १८८५ ते १९३० हा कादंबरी लेखनाचा पहिला टप्पा, तर १९३० नंतरचा काळ हा कादंबरी लेखनाचा दुसरा टप्पा म्हणून ओळखला जातो. १९४५ पासून १९६० सालापर्यंत कादंबरी लेखन जोमाने वाढू शकले नाही. परंतु १९६० साली उद्धव शेळके यांच्या “धग” या कादंबरीतून ग्रामीण जीवन जगणाऱ्या जनतेचे हुबेहूब चित्र रंगवले गेले. ग्रामीण कादंबरी म्हणजे “धगधगत्या ग्रामीण समाजाचे भेदक चित्रण होय” शेतकऱ्यांच्या समस्येत “आधी पेरले तर पिकत नाही, आणि पिकले तर विकत नाही” अशा “अस्मानी व सुलतानी” गर्तेत शेतकऱ्याला सैरभैर करून सोडते. ग्रामीण जीवनातील वास्तवता ही शहरी आणि ग्रामीण या दोहोंच्या मध्ये शिक्षण व्यवस्थेने फार मोठी दरी निर्माण केली. “विषमता” नावाचा रोग औद्योगिक भरभराटीत ग्रामीण जीवनाच्या मागे-पुढे भेडसावू लागला. ग्रामीण जीवनाच्या माध्यमातून कादंबरीतून ग्रामीण लेखकांचे, कादंबरीकारांचे, समीक्षकांचे, असणारे योगदान हेच ग्रामीण जीवनाचे जागृत वास्तव आहे.

**सूचक शब्द**

वैदर्भीय, ग्रामीण, परस्परावलंबी, परिपोषक, प्रादेशिकता सुसंस्कृतता, प्रतिबिंब, कलात्मकता, निवेदक मुख्य, गौण, समाज व्यवस्था, प्रतारणा.

**विषय विवेचन**

कादंबरी म्हणजे समाज व निसर्ग याविरुद्ध व्यक्तींचा चाललेला संघर्ष होय. ग्रामीण कादंबरी मागे, ग्रामीण जीवन असते. या ग्रामीण जीवनाचे प्रश्न, ग्रामीण माणसांची सुखदुःखे, आशा-आकांक्षा, या सर्वांचे प्रतिबिंब वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होताना दिसते. आजच्या शहरी, उद्योग प्रधान, यंत्राधिष्ठीत संस्कृतीपेक्षा ग्रामीण जीवन अत्यंत निराळे आहे. आजचे ग्रामीण जीवन शेतीनिष्ठ, ग्रामीण व्यक्तीच्या मनाचा ठाव घेणारे आहे.

वैदर्भीय ग्रामीण कादंबरीचे वास्तव जाणून घेण्यासाठी चौकस दृष्टी ठेवणे आवश्यक असते. वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा, चित्त वेधक प्रसंग, कादंबरीचे कथानक, पात्रांचे स्वभाव विश्लेषण, पात्रांची संवाद सृष्टी वर्णन आणि भाषा, या घटकांचा स्वतंत्र अंगाने विचार करणे आवश्यक ठरते. ग्रामीण कादंबरीत कथानक म्हणजे लेखकाची वाचकांवर पडणारी छाप, आकर्षकपणा, महत्त्वाची असते. प्रसंग आणि स्वभाव दर्शन ही दोन अंगे ग्रामीण कादंबरीची परस्परावलंबी व परस्पर परिपोषक असावी लागतात. वाचकांची जिज्ञासा कायम ठेवणे हे जास्त महत्त्वाचे असते. ग्रामीण कादंबरीतून नाट्य तंतोतंत उभे राहावे म्हणून संवादाची गरज आहे. कादंबरीची गोडी वाढावी म्हणून सृष्टी सौंदर्य वर्णन करणे आवश्यक आहे.

ग्रामीण कादंबरी म्हणजे धगधगत्या ग्रामीण समाजाचे भेदक चित्रण होय. शेतकरी हा या कृषी व्यवस्थेत पिचला जाणारा घटक, इंग्रजांच्या एकछत्री राजवटीत रयतवारी, महालवारी व कायमदारा या करार पद्धती मुळे कायमच कर्जाच्या ओझ्याखाली दबला गेला. असंघटित असलेला शेतकरी वर्ग नोकरशाहीच्या तुलनेत कनिष्ठ ठरू लागला. हा या कृषी व्यवस्थेचा जुनाट असा रोग विकोपाला जाऊन तो औषधोपचाराने बरा होणारा नाही. म्हणून



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

त्यावर शस्त्रक्रिया करणे हाच एकमेव उपाय आहे. अशा प्रतिक्रिया आमच्या वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून येऊ लागल्या. वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून शेतकऱ्यांच्या समस्या मांडताना "आधी पेरले तर पिकत नाही, आणि पिकले तर विकत नाही" अशा अस्मानी व सुलतानी गतैत शेतकरी सैरभैर झाला आहे. शेतकरी कुटुंबातील स्त्रियांच्या वेदना, समाजात वाटयाला येणारी प्रतारणा, कर्जबाजारी होऊन शेतकऱ्याची झालेली आत्महत्या, ही कृत्ये भ्याडपणाची वाटत असली, तरी ती उत्पादन खर्च हा उत्पन्नापेक्षा अधिक होतो, म्हणून कर्जाच्या ओझ्याखाली चिंताग्रस्त झालेला शेतकरी आधी आत्म्याची व नंतर देहाची हत्या करतो. कारण समाजव्यवस्थेच्या वर्तुळात पहिले आणि शेवटचे टोक "कुटुंब" हेच आहे. हेच ग्रामीण जीवनातील वास्तव आहे. ग्रामीणते बरोबरच विशिष्ट प्रदेशाचे वर्णन व्यक्त करणारी प्रादेशिक कादंबरी, "मनुष्य आणि निसर्ग" यांच्या कथनालाच केंद्रबिंदू मानते. या कादंबरी लेखनातून विविध जाती, जमाती, उपजाती, आणि गावकुसा बाहेरील उपेक्षित थर यांच्या आयुष्याची होणारी परवड व्यक्त केली जाते. ग्रामीण जीवनाचे नवे दर्शन घडवणारा कादंबरीकार म्हणून वैदर्भीय कादंबरीकार सामोराआला. विदर्भाचे कृष्ण कथेशी असणारे गोड नाते म्हणजेच, "आपल्या सौंदर्याने नलराजास स्वतःकडे आकृष्ट करून घेणारी दमयंती" ही विदर्भ कन्याच होती. म्हणूनच विदर्भाची रसिक भूमी गुणवंतांची, संतांची, महंतांची, व प्रतिभावंतांची मानली जाते. वैदर्भीय ग्रामीण कादंबरीकारांचे ठसठशीत, भरीव व मूल्य गर्भ योगदान वास्तवतेत कादंबरी लेखनातून व्यक्त होताना दिसून येते.

तत्कालीन स्त्री अहंकारामुळे, आणि अशाही परिस्थितीत जगण्याचा मार्ग शोधणे नायक-नायिका यांच्या चित्रणातून ग्रामीण भागातील पारंपारिक वृत्ती-प्रवृत्तींवर कादंबरीकारांनी प्रकाश टाकला आहे. ग्रामीण लोकांचे दुःख सहानुभूतीने रेखाटताना गरीब, मध्यम, श्रीमंत, अशा तिन्ही वर्गातील लोक यात दिसून येतात. श्रीमंतांचे चित्र विरळ असून मध्यमवर्गीय शहरी वाटतात. पण मूळचे ग्रामीण भागातील कष्टकरी, गरीब उपासमारीने गांजलेले ग्रामीण लोकांचे जीवन हेच कादंबरीचे वास्तव कथन ठरते.

ग्रामीण जीवनातील वास्तवता, ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होत असताना, काही कादंबरीकारांच्या प्रादेशिकतेची जोड असलेल्या कादंबऱ्या, सुसंस्कृततेच्या दोषापासून मुक्त असलेल्या, मनुष्याने निसर्ग हाच या कादंबरीची केंद्र वस्तू ठरतो. कथा ही ग्राम कथाच असते, आणि या ग्राम कथेचा क्षेत्रीय जीवनाशी संबंध जोडलेला असतो. प्रादेशिक ग्रामीण संस्कृतीला पर्याय प्रदेशाची मर्यादा असते. झोपडपट्टी हा शहराचा एक भाग असला, तरी देशाचा शासन अर्थ शिक्षण व्यवस्थेने निर्माण झालेली आहे. कादंबरी हा जीवन प्रवाहाबरोबर चालणारा, वाढणारा, बदलणारा, असा साहित्यप्रकार आहे. यात घटना, कथानक,पात्रे, निवेदनशैली, भाषा, इत्यादी घटकांनी कादंबरीची संरचना उभी राहते

कादंबरी हा निवेदन प्रदान वाङ्मय प्रकार असल्यामुळे त्यात सांगण्याजोगा मजकूर भरपूर असतो. या मजकुरालाच आपण कथानक असे म्हणतो. कादंबरीच्या या कथानकात घटना, प्रसंग, पात्रे, प्रस्तुतीकरण पद्धती, या सर्वांशी संबंध येतो. कथानक हे एकजिनसी पणाने येणारे घटक असते .म्हणूनच कथानक हे एकात्म होते. कथानकाच्या माध्यमातून अनेक घटना व पात्रे यांच्या परस्पर संबंधातून विविध क्रिया घडत जाऊन, कथानक पुढे सरकत जाते. कथानकाचा अत्यंत लहान असा घटक म्हणजे घटना होय .अशा घटना नैसर्गिक व मानसिक स्वरूपाच्या असतात. या घटना तयार (आयत्या) नसून पात्रांकडून प्रसंग, विशिष्ट ठिकाण, विशिष्ट काळ, अशा घडत असतात.

समाजाचे जीवन आणि काळ हे दोन्ही गतिमान असतात. समाज जीवनात छोट्या-मोठ्या गोष्टी घडताना संवेदनशील कलावंत या गोष्टींची दखल घेतो. त्याला जाणवलेल्या व भावलेल्या अशा गोष्टींची नोंद घेऊन, कादंबरी त्याची प्रतिबिंब उमटवते. हे प्रतिबिंब म्हणजेच वातावरण होय .मानवी जीवनाची गुंतागुंत तो मानवी व्यक्तीच्या जगण्याच्या संदर्भात साहित्याचा मानवी जीवन जगण्याचा संदर्भ फार व्यापक आहे. सूचकता हा कुठल्याही साहित्याचा आवश्यक गुण ठरतो. कारण सुचकतेमुळेच साहित्याला कलात्मकता प्राप्त होते, अशा कलात्मक साहित्याच्या वाचनासाठी वाचकांची रसिकताही कारणीलागत असते, त्याला कलाकृतीचा आनंद मिळतो. सुचकताही मुख्यत्वे वातावरण निर्मितीच्या द्वारे निर्माण केली जाणारी एक व्यापक घटक असते. या वातावरणामुळेच कादंबरीला



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
UGC CARE I

संदर्भ प्राप्त होऊन व्यापक आलोक किंवा फलक प्राप्त होतो. म्हणूनच कादंबरी हा जीवनाशी समांतर जाणारा वाडमय प्रकार आहे. जीवनातल्या लयी प्रमाणेच हा वाङ्मय प्रकार ही लयबद्ध होतो. जीवनातील हेलकाव्यांचे प्रतिबिंब या प्रकारात डोकावताना दिसून येते. कादंबरी संरचनेतील विविध घटकांमध्ये घटना हा सर्वात लहान घटक, या घटना नैसर्गिक तसेच मानसिक स्वरूपाच्या असतात. कादंबरीतील विशिष्ट वातावरणात पात्रांकरवी घडत असताना स्वाभाविकच या घटनांमध्ये विविध पात्रांचे विविध प्रकार, हेतू प्रतिबिंबित होताना दिसते. या घटनांमागे लेखकाची जीवन सरणी व मूल्य प्रणाली उभी राहते. कादंबरी ती कादंबरीची शब्दार्थ मय संसार कहाणी, कादंबरी निवेदक पात्राकडून व्यक्त करतो. या निवेदक पात्रांची एक जीवनदृष्टी, कथा हेतू असतो. पण निवेदकाच्या या हेतूमागे लेखकाची व्यापक भूमिका असते, ही भूमिका मूल्याधिष्ठित व कलाप्रेणीत असते. लेखक आपल्या दृष्टिकोनानुसार त्याच्या अंतस्थ असणाऱ्या हेतूंची, मूल्यांची, कलात्मकतेची अविष्कार रूपाने, कादंबरीची रचना करून, त्यात पात्रे, वातावरण, भाषा, इत्यादी घटकांना संयोजित करीत असतो.

कादंबरीत लेखक, निवेदक व अन्य पात्र यांच्या हेतू मधील व जीवनसृष्टी मधील देवघे महत्त्वाची ठरते.कादंबरीत या तिघांचे हेतू साकार होत असताना, प्रारंभापासून अखेरपर्यंत कथानकाची व्याप्ती दिसून येते. कथानक हे प्रवाही ठेवावे लागते. कारण एका घटनेतून दुसरी घटना अशी साखळी असावी लागते. आशयाला अनुरूप अशी भाषा वापरत, कादंबरीतील उत्कर्ष, हुरहुर व विस्मय या तिन्ही घटकांनी कथानकाला आकर्षक बनवायचे असते. कादंबरीतील विशिष्ट हेतूंनी इतिहासकालीन पुराणातील वातावरण उभारून तत्कालीन जीवन दर्शक घडवून ती ऐतिहासिक व पौराणिक बनलेली असते. विशिष्ट प्रदेश ग्रामीण विभाग या माध्यमातून प्रादेशिक, ग्रामीण बनलेली दिसून येते. कादंबरीत कथानकाला गतिमान करण्याचे काम पात्रांच्या माध्यमातून केले जाते. एखाद्या कादंबरीत किती पात्र असावी, त्याला ठराविक नियम नाही. तर कादंबरी हा वाङ्मय प्रकार समाज जीवनाबरोबर वाढत राहणारा असल्यामुळे, समाज जीवनातील व्यवहार, माणसातील परस्पर संबंध, राग, लोभ हर्ष, खेद या भावना यांच्या केंद्रस्थानी, “माणूसच” असतो. व्यक्ती-व्यक्तींच्या संबंधाच्या जाळयांनीच समाज घडतो. समाजाचे खरे दर्शन व्यक्तींच्या विविध कृती-उक्तिद्वाराच घडते. या कृती-उक्ति व्यावहारिक तसेच मानसिक असतात. कादंबरीतील पात्रे ही खरी नसून खरे असल्याचा आभास निर्माण केलेला असतो. एकाच कादंबरीकाराने त्या निर्माण केलेल्या असतात. प्रत्येक पात्राला विशिष्ट व्यक्तिमत्व दिले जाते. लेखकाने आपले विविध अनुभव पात्रांमध्ये वाटून दिलेले असतात. काही पात्रे नैसर्गिक व मानसिक दृष्ट्या खूप समृद्ध असतात. अशा रंगवलेल्या पात्रांना ‘कागदी पात्रे’ असे म्हणतात. कादंबरीत येणाऱ्या पात्रांचे मुख्य पात्रे व गौण पात्रे असे दोन विभागात वर्गीकरण केले जाते. मुख्य पात्रात नायक, नायिका, खलनायक प्रतिनायक यांचा समावेश होतो, तर गौणपात्रात इतर सर्वसाधारण पात्रांचा समावेश होतो. कादंबरीतील मुख्य गौण दोन्ही पात्रे महत्त्वाची असतात. कादंबरीतील पात्रे जशी मानवी असतात, तशी अमानवी देखील असतात. एखाद्या वैज्ञानिक कादंबरीत एखादे यंत्र पात्र असेल, निसर्ग पात्र रुपीअसेल, विशिष्ट व्यक्तींशी निगडित असलेला एखादा संदर्भ देखील पात्ररूप होतो.

कादंबरी हा जीवन प्रवाहाशी समांतर चालणारा, वाङ्मय प्रकार आहे. एका व्यक्तीचे जीवन, समाज प्रवाहाशी जुळवत, टक्कर देत, जगत असते. या जगण्याच्या धडपडीत विविध स्थळी, विविध काळी, अनेक नात्यांनी बांधले जाते. यामुळे मानवी जीवनातला बाह्य यंत्राने सुद्धा आपोआपच गुंतागुंत प्राप्त होते. त्या गुंतागुंतीची उकल माणूस ढोबळ प्रसंगाद्वारे जशी करतो, तशीच अंतर्मुख होऊन, मनात विचार करून, मानसिकदृष्ट्या ही करतो. कधी निसर्गाच्या विराट स्वरूपाशी नाते जुळवून गुंतागुंत उकलण्यासाठी प्रयत्न करतो. हे जीवन जगण्याचे एकूण स्वरूप आहे. त्यातूनच वातावरण आपोआप निर्माण होते. कादंबरीकार घटना, प्रसंग, व्यक्ती, यांच्याद्वारे कथानक निर्माण करतो. या कथानकाला वास्तवता, अस्सलपणा प्राप्त होण्यासाठी वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. विशिष्ट स्थळ व काळ यांची निर्मिती करून व्यक्तींच्या हालचालीस वाव देण्याची गरज असते. ही स्थलकालनिर्मिती पूर्णतः काल्पनिक असली, तरी वातावरण निर्मितीमुळे वास्तव किंवा खरी वाटायला लागते.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

कादंबरी हा निवेदन प्रधान वाङ्मय प्रकार आहे .कादंबरीला कथानक असते, हे कथानक निवेदन या प्रस्तुतीकरण पद्धतीच्या द्वारे सांगावे लागते. हे निवेदन करण्यासाठी प्रथम पुरुषी (मी, आम्ही) हा निवेदक असतो. कधी तृतीय पुरुषी (तो, ती, ते,) त्यातील निवेदक असतो. निवेदक हे कथानकातील सर्व घटना, प्रसंग, यांना धरून येते. म्हणून त्यात पात्रा-पात्रात संभाषण असते .कधी एकाच पात्राच्या मनातील स्वभाषण असते. निवेदनात घटना प्रसंगांवरची भाष्य असतात. या निवेदनाची वेगवेगळी माध्यमे असतात. निवेदक एका प्रकारे सर्वज्ञ व सर्व साक्षी असतो. सर्व घटना प्रसंगांच्या वेळी जणू काही तो उपस्थित असतो. पात्रांच्या अंतस्थ हालचाली ही त्याला कळत असतात. प्रथम पुरुषी निवेदनात निवेदकाच्या चिंतनाला व अंतर्मुखतेलाअधिक वाव असतो. भाषा ही खास मानवी संवादाची व्यवस्था आहे. म्हणून भाषेला एक पायाभूत सामाजिक संस्था म्हंटले जाते. मानवाच्या बाह्य व्यवहारासोबतच, भाषा मनातील अंतरिक व्यवहारही पार पाडते. भाषा ही सर्वच मानवाची समान मक्तेदारी असल्यामुळे व्यापक असते. पण समान हितसंबंधी गटात व्यवहारासाठी किंवा व्यक्तीच्या वैयक्तिक राग-लोभ याभावनांना धरून तिचा हेतूपूर्वक व गरजेनुरूप वापरही होतो. अशा वापरातील भाषा ही व्यापक व स्थिर रूप प्राप्त झालेल्या भाषेपेक्षा निराळी असते. म्हणजे तिला अस्थिर रूप प्राप्त होते. शेतकरी, व्यापारी, हमाल वगैरे मंडळी त्यांच्या गरजा प्रमाणे भाषेचा वापर करून भाषेची अस्थिर रूपे निर्माण करतात. बदल हा भाषेचा मुख्य गुण आहे म्हणून ती सतत प्रवाही असते. त्याला कारण भाषा ही व्यक्ती परत्वे, जाती-जमातीनुसार, भौगोलिक प्रदेशानुसार व कालगणिक बदलत असते. कादंबरीकाराचा दृष्टिकोन हा कादंबरीचे रूप म्हणजे रचना यांचा परस्पर संबंध असतो. आत्मशोध, जीवन शोध या साहित्याच्या प्रेरणा कादंबरी आत्मशोधाची म्हणजेच स्वतःचा शोध घेण्याची प्रेरणा अद्‌भुतरम्य, स्वप्नरंजन, रोमँटिक, वास्तवाच्या पलीकडच्या अवस्थेत प्रगटलेली दिसते. जीवन शोधाची प्रेरणा मात्र काही कादंबऱ्यात समकालीन जीवन शोध व कादंबरीचे रूप यांचे नाते विस्कळून केवळ तंत्रमंत्रात्त्मक वाढलेली दिसते. त्यामुळे जीवन जाणिवा या जितक्या तीव्रतम स्वरूपात अविष्कृत व्हायला लागल्या, तेवढ्या त्या कादंबऱ्यात झालेल्या दिसत नाही. शैलीनिष्ठ, तंत्रनिष्ठ, समजून, सजवून वापरलेली भाषा या तांत्रिक भोवऱ्यात बऱ्याच कादंबऱ्या अडकलेल्या दिसतात. म्हणूनच साहित्याची निर्मिती, आकलन, आस्वाद व समीक्षा हे भाषेद्वारे होते. भाषेमुळे डोळ्यासमोर एखादी आकृती उभी राहते. कारण शब्दांना संकेताने प्रतिकात्मक अर्थ चिकटलेले असतात. साहित्यकृती ही शब्दरूप असते. हे शब्द रूप काव्य, कथा, नाट्य, इत्यादी प्रकारचे असते. साहित्यिकाची प्रतिभा या रूपाद्वारे प्रकट होते. म्हणून साहित्यकृती ही एक भाषिक घटना आहे .कादंबरी हा खूप मोठा भाषिक आवाका असलेला वांङमय प्रकार आहे. या भाषिक आवाक्याला रुढअर्थाने गद्यमय स्वरूप प्राप्त होते. त्यायोगे कविता हा मर्यादित भाषिक आवाका असलेला पद्यमय वाङमय प्रकार आहे. या वाङमय प्रकारात गणिक भाषा आपली रूपे बदलत कवितेतील भाषा संवादाचे प्रदान कार्य सांभाळून भाव तीव्रतेने व्यक्त करण्यासाठी साधन रूप न राहता माध्यम होते. म्हणून कादंबरी हा रुढार्थाने गद्य वाङ्मय प्रकार असला तरी तो काव्यात्म होऊ शकतो.

कादंबरी हा जीवन प्रवाहाबरोबर वाहत, वाढत, विकसित होत जाणारा वाङमय प्रकार आहे. जीवनातील अनेक घटना, माणसातील विविध प्रकारचे संबंध, एकाच व्यक्तीच्या मनातील विचारांची गुंतागुंत ही कादंबरीच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे व्यक्त होऊ शकतील यासाठी भाषा ही अशा सूत्राला अनुसरून वापरली जाते, घटना प्रसंगांची वर्णने, मानवी मनातील भावनांची स्पंदने, स्थळ प्रदेशाची वर्णने, ही भाषेद्वारे केली जाते. त्यामुळे भाषेला असे अनुरूप वास्तव, अतिवास्तव, सौंदर्यलक्षी, अशी परिमाणे प्राप्त करून घ्यावी लागतात. प्रत्येक वाङमय प्रकाराला स्वतःची अशी एक चौकट असते. तिला आपण शब्दसंहिता म्हणू, ही शब्दसंहिता विशिष्ट भाषिक रूपा द्वारा घडविली जाते. उदा. कवितेच्या शब्दसहिता शब्द, वाक्य, कडवी, प्रतिभा, रूपके, प्रतीके, लय, अशी भाषिक रूपे असतात. तर कादंबरीत शब्द, वाक्य, परिच्छेद, जीवनआशय इत्यादी रूपे असतात. यावरून आपल्याला कलाकृतीचा एकात्म अनुभव घेता येतो. मराठी साहित्यात असा एक प्रवाह म्हणून ओळखला जातो, तो म्हणजे ग्रामीण, हे ग्रामीण साहित्यातील अभिव्यापक आशयाचे वर्णनात्मक विशेषण आहे. म्हणूनच १९६० नंतर ग्रामीण कादंबऱ्यातून



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

समाजाविषयीचे कुतूहल व्यक्त करून, पिळदार भाषेत गावरान ठसका आणि न्यारा रुबाब असणाऱ्या कादंबऱ्या वाचकांसमोर आल्या. आधुनिकीकरणामुळे ग्रामीण जीवनात घडणारे स्थित्यंदर १९६० नंतरच्या कादंबरीतून दिसून येते. प्रादेशिक बोलीभाषा व तिची ताकद पाहून लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे. वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून समाजातील सत्य परिस्थितीचे चित्रण आले आहे. म्हणूनच ग्रामीण कादंबरी ही वैदर्भीय कादंबरी म्हणून ग्रामीण जीवनाची कथा ठरते.

**समारोप**

ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून खेड्यातील वास्तव चित्रण रेखाटले आहे. कारण समाज व्यवस्थेच्या वर्तुळाचे पहिले आणि शेवटचं टोक कुटुंब आहे, त्या कुटुंबाच्या समस्यांचे निराकरण करणे, ग्रामीण शेतकऱ्यांच्या दैनावस्थेची चिकित्सा करणे, या दैनावस्थेला कारण ठरणाऱ्या ऋण (कर्ज) पद्धती बंद करणे, तसेच शेतकरी वर्गातील गरीब कुटुंबातील स्त्रियांच्या वेदना, कोंडमाऱ्याच जीवन, या माध्यमातून सामाजिक, राजकीय व आर्थिक दृष्टिकोनातून वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून समाजातील सत्य परिस्थितीचे चित्रण आले आहे. म्हणूनच ग्रामीण कादंबरी ही वैदर्भीय कादंबरी म्हणून ग्रामीण जीवनाची कथा ठरते.

**संदर्भ**

१. आवलगावकर अविनाश, - मराठी साहित्य संशोधन: नव्या दिशा, अरुण धारगावकर, प्रतिमा प्रकाशन पुणे.
२. कुलकर्णी प. अ., - मराठी कादंबरीची वाटचाल, पुणे, लेखक, प्रथम आवृत्ती १९७२.
३. कुलकर्णी वा. ल., - साहित्य: स्वरूप आणि समीक्षा मुंबई, पॉप्युलर प्रकाशन १९६७.
४. कोतापल्ले नागनाथ, - ग्रामीण साहित्याची चळवळ, प्रथम आवृत्ती २०१०.
५. फडके भालचंद्र, - मराठी कादंबरीतील वाटचाल, कुलकर्णी ग्रंथकार रौप्य महोत्सव स्मरणिका पुणे १९७१.



Copyright © | JET Network, All Rights Reserved